## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये शपथेवर फिर्यादीचे सत्यापण

नि.**फौ.खटला क्र.३६३/२०२५**

समीर रज्जाक खाटीक वि असिफ बशीर मुल्ला

**निशानी क्र.०१ खाली**

**मी प्रतिज्ञापुर्वक सांगते की–**

माझे नांव – समीर रज्जाक खाटीक

वय – ५१ वर्ष, व्यवसाय – गाडी व्यवसाय

राहणार– लक्ष्मी मंदीर, कुपवाड रोड, रुम नं १९६ सांगली

**शपथेवर कथन करते की–**

०१. माझा जुना गाडया खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. मी तिन्ही आरोपींना ओळखतो. आरोपी हे मित्रांच्या गल्लीत रहातात त्यामुळे त्यांची व माझी ओळख झाली. आरोपी क्र १ ची माझी गाडीच्या व्यवहारामुळे माझी ओळख झाली. आरोपी क्र १ सोबत माझी गाडीची देवाण घेवाण झाली होती त्या गाडीचा क्र के.ए. २३बी ४९७३ असा आहे. सदर व्यवहार दिनांक ०२/११/२०२३ रोजी ४,८०,००० रुपयाला व्यवहार केला होता. त्यापैकी १,४०,०००/– आरोपी क्र १ यांची पत्नी समीना शेख यांच्या नावे गुगल पे ने पाठविले होते. उर्वरित रक्कम मी आरोपी क्र १ यांना रोखीने दिले. त्यासंदर्भात मी दस्त नोटरी दिनांक ०२/११/२०२३ रोजी केला होता. सदर दस्त हा मी न्यायालयात दाखल केला आहे. सदर दस्तावर आरोपी क्र १ व माझी सही आहे व साक्षीदारांच्या सह्या आहेत. ज्यांच्या समक्ष नोटरी केली त्यांची देखील सही आहे.

२. सदर गाडीवर हिंदुजा फायनान्स लि. चिक्कोडी यांचे कर्ज होते. आरोपीने फायनान्स कंपनी चे एन.ओ.सी ३ महिन्यात घेवून देतो असे मान्य केले होते. सदर आरोपी क्र १ हा त्यानंतर बनावट नोटांच्या प्रकरणात अटक झाली व तो सध्या जेल मध्ये आहे. आरोपीकडून कर्जाची परतफेड झाली नाही व फायनान्स कंपनी यांनी गाडी जप्त केली आहे. त्यानंतर मी आरोपी क्र १ ची पत्नी व आई यांना भेटलो व पैशांची मागणी केली. मी आरोपी क्र १ ची जेल मध्ये भेट घेतली. त्याने मला माझ्या तीन घरापैकी एक घर ३ वर्षासाठी लिहून देतो असे सांगितले व आरोपी क्र ३ यांनी मला नोटरी दस्त करुन दिला त्यावर माझी,साक्षीदारांची, आरोपी क्र ३ व नोटरी दस्त करणा–यांची सही आहे. तो कागद न्यायालयात दाखल केला आहे.

३. सदर दस्त सन २०२४ आरोपी क्र ३ ने करुन दिला. परंतू आरोपी क्र ३ यांनी मला घर ताब्यात दिले नाही. मी ताबा मागण्यासाठी गेलो असता माझ्यासोबत भांडण केले. आरोपी क्र १ ते ३ यांनी माझी फसवणूक केली म्हणून मी मिरज शहर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली. सदर २०२४ साली दिलेली तक्रार दाखल केली आहे त्यानुसार पोलीसांनी माझा जबाब घेतला त्याची प्रत मी न्यायालयात दाखल केली आहे. पोलीसांनी त्यांच्याविरुध्द कार्यवाही केलेली नाही. आरोपी क्र १ ते ३ यांनी माझी फसवणूक केली. सबब मला न्याय मिळावी अशी माझी मागणी आहे.

(समीर रज्ञाक खाटीक)

**सही/अंगठा** Samir R K

मिरज

दि.१२.११.२०२५

**[प्रविण उ. कुलकर्णी]**

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी न्यायालय क्र.२ मिरज.